# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## नवीन महाविद्यालयाकरीता

## जाहीर प्रगटन

संदर्भ :— १)शासनाचे पत्र क्र.संकीर्ण—२०२६/ई—१७५५४८५/विशि—५ दि. २५/०९/२०२६
२)शासन निर्णय क्र एनजीसी २०२५/१३१९८७८/मशि—४, दि. १८/०९/२०२५.
३)शासन निर्णय क्र एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि—४, दि. १५/०९/२०१७

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड हे शैक्षणिक वर्ष २०२७—२८ करिता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील (नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर जिल्हा) शैक्षणिक संस्थेकडून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासनाने मान्य केलेला स्थळबिंदु (Location) नुसार प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सादर करावयाचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव शासन निर्णय परिशिष्टांसह विद्यापीठ संकेतस्थळ www.srtmun.ac.in यावर Announcements / Circulars – Academic (Affiliation) Section मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व प्रस्ताव New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीद्वारे स्विकारण्यात येणार आहेत.

इच्छुक संस्थेने नवीन महाविद्यालयाचे प्रस्ताव सादर करतांना वरील संदर्भीय क्र. २ व ३ शासन निर्णयातील परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे विहीत शुल्कासह NCPS या ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करून त्याच्या दोन प्रती (Hard Copy) आवश्यक सर्व कागदपत्रे जोडुन विद्यापीठातील संलग्नीकरण विभागात सादर करण्याची अंतिम तारीख दि. ३०/०९/२०२६ ही आहे. अंतीम तारखेनंतर कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

बृहत आराखडयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संस्थेने नवीन महाविद्यालयासाठी मागणी करण्यापूर्वी सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोग विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या तरतूदीची पुर्तता नॅक, मूलभूत शैक्षणिक व भौतिक सुविधा, अर्हताधारक प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र, तसेच बृहत आराखडयामध्ये निश्चित केलेल्या स्थळ/बिंदुच्या ठिकाणी आवश्यक जमीन, इमारत, प्रस्तावित महाविद्यालयासाठी इमारतीचा वास्तुशास्त्राकडून तयार करुन घेतलेला नकाशा, इत्यादी सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन महाविद्यालयासाठी प्रस्ताव /आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी या बाबत खातरजमा करून घ्यावी. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ नुसार नवीन महाविद्यालयासाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी शासनाने New College Permission System (NCPS) ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. सदर प्रणालीची लिंक https://htedu.maharashtra.gov.in/NCPS/ अशी आहे. सर्व प्रस्ताव हे Online पध्दतीने आवश्यक प्रक्रिया शुल्कासह सादर करावे (शुल्क तक्ता सोबत जोडण्यात येत आहे.) संलग्निकरण शुल्क तक्त्यातील ७ क्रमांकानुसार प्रक्रिया शुल्क (Processing Fees) + प्रस्ताव शुल्क रु.२२००/= एकुण शुल्क विद्यापीठाच्या Website वरील Online Payment Gateway UPI, Card, Net Banking, RTGS/NEFT/IMPS द्वारे भरणा करावे. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची हार्डकॉपी दोन प्रतीमध्ये परिशिष्ट 'अ' नुसार मुद्देनिहाय क्रमवार कागदपत्र जोडावीत त्यास अनु क्र. द्यावा व अनुक्रमानिका तयार करावी, पताका लावावेत तसेच प्रस्तावावर सोबतच्या सर्व छायांकित पानांवर साक्षांकन करून दि. ३०/०९/२०२६ पर्यंत विद्यापीठात सादर करावे.

वरीलप्रमाणे विद्यापीठात नवीन महाविद्यालयासाठी प्राप्त प्रस्तावाची परिशिष्ट 'अ' नुसार छाननी समितीने पात्र केलेल्या प्रस्तावाकरिता विद्यापीठाकडुन पाहणी समिती पाठविण्यात येईल. वरील प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीमध्ये ऑफलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार नाहीत याची सर्व संबंधीतानी नोंद घ्यावी

विद्यापीठ संकेतस्थळ : www.srtmun.ac.in

संदर्भ:—शैक्षणिक/संलग्न—०३/२०२६—२७/550
दिनांक : २६/०९/२०२६
स्थळ : नांदेड.

कुलसचिव
कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड